# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 06 January 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०६ जानेवारी २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- कर्नाटकात दोन तर गुजरातमध्ये एका अर्भकांना एचएमपीव्ही विषाणूची लागण झाल्याचं स्पष्ट
- रेल्वेच्या प्रगतीमुळे विकसित भारताचं उद्दिष्ट लवकर पूर्ण होईल–पंतप्रधानांचं प्रतिपादन
- छत्तीसगडमध्ये नक्षलवाद्यांनी केलेल्या भूसुरंग स्फोटात आठ सैनिकांना वीरमरण
- मस्साजोग हत्येप्रकरणी सर्वपक्षीय शिष्टमंडळाकडून राज्यपालांना निवेदन सादर

आणि

- दर्पण दिन सर्वत्र विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून साजरा

****

केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं कर्नाटकात दोन तर गुजरातमध्ये एका अर्भकांना एचएमपीव्ही विषाणूची लागण झाल्याचं सांगितलं आहे. कर्नाटकात आढळलेल्या तीन महिन्याच्या अर्भकाला रुग्णालयातून सुटी देण्यात आली असून आठ महिन्याच्या अर्भकावर अद्याप रुग्णालयात उपचार सुरू असल्याचं आरोग्य मंत्रालयाकडून सांगण्यात आलं आहे. गुजरातमध्ये अहमदाबाद इथं या रोगाची लागण झालेलं बालक दोन महिने वयाचं असल्याचं, दूरदर्शन वृत्तवाहिनीनं सांगितलं आहे.

दरम्यान हा एक सामान्य श्वसन आजार असून, यात सर्दी आणि तापाची लक्षणे दिसून येतात. या आजाराचा विषाणू श्वसनमार्गाच्या वरील भागातील संसर्गास कारणीभूत ठरतो. या अनुषंगानं केंद्रीय आरोग्य विभागानं एक परिपत्रक जारी केलं आहे.

याबाबत आवश्यक दक्षता घेण्यात येत असून नाहक भीतीचे वातावरण निर्माण करण्याची गरज नसल्याचं, आरोग्य मंत्रालयानं म्हटलं आहे. नागरिकांनी खोकला किंवा शिंक येतांना रुमालाचा वापर करावा, सार्वजनिक ठिकाणी जाणं टाळावं, सॅनिटायझर किंवा साबणाने हात स्वच्छ धुवावेत, हस्तांदोलन टाळावं, तसंच आजारी लोकांच्या संपर्कात येणं टाळावं, असं आरोग्य मंत्रालयानं म्हटलं आहे.
महाराष्ट्रात आतापर्यंत या संसर्गाचा एकही रुग्ण आढळला नसल्याचं राज्य आरोग्य सेवा संचालनालयानं कळवलं आहे. नागरिकांनी याबाबत घ्यावयाच्या काळजीसंदर्भातील सूचनांचे पालन करण्याचं आवाहन आरोग्य विभागानं केलं आहे.
दरम्यान, या आजारासंदर्भात राज्यसरकार लवकरच मार्गदर्शक सूचना जारी करेल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं आहे –

> ***प्राथमिक माहितीनुसार हा व्हायरस नवीन नाहीये. यापूर्वी देखील हा व्हायरस आलेला आहे. पुन्हा त्या व्हायरसचा चंचूप्रवेश होताना दिसतो आहे. यासंदर्भात जी काही अॅडव्हायजरी आहे, ती आम्ही लवकरच जारी करू.***

****

रेल्वेच्या प्रगतीमुळे विकसित भारताचं उद्दिष्ट लवकर पूर्ण होईल असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. मोदी यांच्या हस्ते आज दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून रेल्वेशी संबंधित विविध प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन झालं, त्यावेळी ते बोलत होते. विविध चार निकषांच्या आधारावर रेल्वेचा विकास करत असल्याचं पंतप्रधानी नमूद केलं. ते म्हणाले –

> ***भारत मे रेलवे के विकास को हम चार पॅरामिटर्स पर आगे बढा रहे है। पहला रेलवे के इन्फ्रास्ट्रक्चर का मॉडर्नायझेशन। दुसरा रेलवे के यात्रियों को आधुनिक सुविधा। रेलवे की देश के कोने कोने में कनेक्टीव्हीटी। चौथा रेलवे से रोजगार का निर्माण, उद्योगों को सपोर्ट।***

****

पंचायत से पार्लमेंट टू पॉईंट झीरो या कार्यक्रमाचं उद्घाटन लोकसभेचे अध्यक्ष ओम बिरला यांच्या हस्ते आज नवी दिल्लीच्या संविधान सदनात झालं. आत्मनिर्भर भारताचं स्वप्न साकारण्यासाठी तसंच महिलांना आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या

सबल बनवण्यासाठी पंचायती राज संस्था महत्त्वाची भूमिका पार पाडत असल्याचं, बिरला यांनी सांगितलं. ते म्हणाले –

> ***हर क्षेत्र के अंदर इस देश की महिलओं ने इस देश के विकास में बहोत बडा योगदान दिया है। और आज मुझे खुशी है, की जनजाती क्षेत्र से हमारी लोकतंत्र की सबसे महत्वपूर्ण संस्था पंचायत राज के अंदर आप के नेतृत्व से उन जनजाती क्षेत्र के अंदर सामाजिक, आर्थिक विकास, महिलओं को स्वावलंबन बनाना ग्रामीण उद्योग को बढाना उसमे भी आप का बहोत बडा योगदान है।***

केंद्रीय महिला आणि बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांचंही भाषण कार्यक्रमात झालं. २० राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशातल्या मिळून पंचायती राज संस्थांमधल्या सुमारे ५०० महिला प्रतिनिधी या कार्यक्रमात सहभागी झाल्या आहेत.

****

छत्तीसगड इथल्या विजापूर जिल्ह्यात आज नक्षलवाद्यांनी केलेल्या भूसुरंगाच्या स्फोटात आठ सुरक्षा सैनिक आणि चालक ठार झाले. पंधरा जणांच्या जिल्हा राखीव रक्षक दलाची तुकडी, संयुक्त कारवाईनंतर दंतेवाडा इथून वाहनानं परतत असताना कुत्रु–बेद्रे रस्त्यावर नक्षलवाद्यांनी भूसुरुंगाचा स्फोट केला. स्फोटानंतर नक्षलवाद्यांनी सुरक्षा सैनिकांवर गोळीबार सुरू केला. या घटनेत पाच सैनिक जखमी झाले असून त्यापैकी तिघांची प्रकृती चिंताजनक असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

महायुती सरकारमध्ये पालकमंत्रिपदाबाबत कोणताही तिढा नसून, याबाबत लवकरच निर्णय होईल, असं, महसूल मंत्री आणि भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटलं आहे. ते आज नागपूर इथं प्रसार माध्यमांशी बोलत होते. बीड हत्या प्रकरणातील आरोपींना कठोर शिक्षा होईल असं बावनकुळे यावेळी म्हणाले. वक्फ बोर्डाकडे चुकीच्या पद्धतीने गेलेल्या देवस्थानच्या जमिनी परत मिळवण्यासाठी सरकार काम करत असल्याची माहिती बावनकुळे यांनी दिली.

****

बीड जिल्ह्यात मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी सर्वपक्षीय नेत्यांच्या शिष्टमंडळानं आज राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांची भेट घेतली. तपास पूर्ण होईपर्यंत मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्यावा, वाल्मिक कराड यांच्यावर हत्येचा गुन्हा नोंदवावा, तसंच तपास पथकात निष्पक्ष अधिकाऱ्यांचा समावेश करण्याची मागणी शिष्टमंडळानं यावेळी राज्यपालांकडे केली. विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार, आमदार संदीप क्षीरसागर, माजी खासदार छत्रपती संभाजीराजे यावेळी उपस्थित होते.

****

दरम्यान, मंत्री धनंजय मुंडे यांनी माध्यमांशी बोलतांना, यासंदर्भात प्रतिक्रिया देण्यास नकार दिला. तपास संस्था त्यांचं काम योग्यप्रकारे करत असून, त्याबद्दल बोलणं योग्य ठरणार नाही, असं मुंडे यांनी म्हटलं आहे. ते म्हणाले –

> ***सर्व चौकशा नेमलेल्या आहेत. त्या तपासामध्ये ज्यावेळेस माझ्याकडे संशयानं बघितलं जातं, मी त्यावर बोलणं काही उचित नाही. आणि अतिशय व्यवस्थित तपास त्याठिकाणी चालू आहे. तपास पूर्ण होऊ द्या.***

बीड इथं सरपंच संतोष देशमुख हत्येप्रकरणी जिल्ह्याची होणारी बदनामी थांबण्यासाठी लढा उभा करू, अशी भूमिका राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे युवा नेते अविनाश नाईकवाडे यांनी मांडली आहे. धनंजय मुंडे यांच्यावर जाणीवपूर्वक आरोप केले जात असल्याची टीका नाईकवाडे यांनी केली. हिंसेचं वातावरण तसंच जातीवाद थांबला पाहिजे, तसंच दोषींना फशीची शिक्षा झाली पाहिजे अशी मागणी नाईकवाडे यांनी केली.

दरम्यान, बीड शहरात आज संविधान बचाव मोर्चा काढण्यात आला. परभणी इथल्या घटनेचा निषेध व्यक्त करत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या विरोधातही यावेळी घोषणाबाजी करण्यात आली. सोमनाथ सूर्यवंशी यांच्या हत्येला जबाबदार असलेल्या पोलिसांवर गुन्हे दाखल करण्यासह अन्य मागण्या यावेळी करण्यात आल्या.

****

शिखांचे दहावे गुरू, गुरू गोविंदसिंह यांच्या प्रकाश उत्सवानिमित्त आज सर्वत्र त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरु गोविंदसिंह यांना आदरांजली अर्पण केली आहे.

प्रकाश पर्वानिमित्त ठिकठिकाणच्या गुरुद्वारांमधे विशेष प्रार्थना घेण्यात आल्या. नांदेडच्या सचखंड गुरुद्वारातही प्रकाश पर्वानिमित्त भाविकांची गर्दी झाली आहे.

****

दर्पण दिन आज साजरा होत आहे. आद्य पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी सुरू केलेल्या दर्पण या पहिल्या मराठी वृत्तपत्राचं स्मरण म्हणून हा दिवस साजरा केला जातो.

नवी दिल्ली इथं महाराष्ट्र परिचय केंद्रात 'मराठी पत्रकार दिन' साजरा करण्यात आला. उपसंचालक अमरज्योत कौर अरोरा यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

बीड जिल्हा माहिती कार्यालयात आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं. जालना जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते ज्येष्ठ पत्रकारांचा सत्कार करण्यात आला.

छत्रपती संभाजीनगर इथं अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या वतीने प्रसारमाध्यमात कार्यरत १५१ जणांचा आज गौरव करण्यात आला. यावेळी परशुराम अर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष कॅप्टन आशिष दामले, महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ गोविंद कुलकर्णी, प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर, जिल्हाध्यक्ष सुधीर नाईक यांच्यासह प्रसिध्द उद्योजक विवेक देशपांडे तसंच अनेक मान्यवरांची विशेष उपस्थिती होती. शहरातील लायन्स क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर मिडटाऊनच्या वतीनंही आज पत्रकारांचा सत्कार करण्यात आला.

धाराशिव इथं जिल्हा पत्रकार संघाच्या वतीनं पत्रकार आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आलं. यावेळी जिल्हाधिकारी डॉक्टर सचिन ओंबासे, आमदार कैलास पाटील उपस्थित होते. पत्रकारांनी जिल्ह्याच्या विकासासाठी सकारात्मक पत्रकारिता करावी आणि शाश्वत विकासावर भर द्यावा, असं आवाहन आमदार पाटील यांनी यावेळी केलं.

****

अहिल्यानगर जिल्ह्यातल्या कुकडी आणि घोड प्रकल्पातून प्रत्येकी चार आवर्तन देण्यात येणार असल्याचं जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी यांगितलं. आज याबाबत झालेल्या कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत हा निर्णाय घेण्यात

आला. प्रत्यक्षात पिकांचा प्रकार आणि गरज लक्षात घेऊन पाणी देण्याच्या सूचना पाटील यांनी यावेळी संबंधीत अधिकाऱ्यांना दिल्या.

****